Website : www.jsbsatara.com
E-mail :ceo@jsbsatara.com

जनता सहकारी बँक लि., सातारा
JANATA SAHAKARI BANK LTD., SATARA.
Head Office : 179, Bhavani Peth, Satara - 415 002.
Phone No. 02162 - 227346, 227347, 236155, 234491

Ref. No.

Date : 10 APR 2023

# बॅंकेकडील ठेवीदारांसाठी महत्त्वाची सुचना

बँकेच्या सर्व सन्माननीय ठेवीदारांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपण बँकेकडे ठेवलेल्या मुदत ठेवींची मुदत संपल्यानंतर बँकेकडून आपणास पोस्टाद्वारे टपाल पाठवून,आपला मोबाईल नंबर उपलब्ध असल्यास फोनवर संपर्क करून अथवा आपणास समक्ष भेटून कळविण्यात येते. तरी आपण बँकेत समक्ष येवुन अथवा ठेव पावती आपल्या प्रतीनिधीमार्फत समक्ष पाठवुन आपल्या मुदत ठेवीची मुदत संपल्याच्या कालावधीपासून पुढील १४ दिवसाच्या आत मुदत वाढवून घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आपणास ठेवीवर बँकेने ज्या त्या वेळी निश्चित केलेल्या व लागू असलेल्या व्याजदराप्रमाणे ठेव पावत्यांचे नूतनीकरण करून दिले जाईल.मात्र १४ दिवसांच्या कालावधीनंतर ठेव पावत्या या मुदत संपल्याचा तारखेपासून नूतनीकरण करावयाच्या तारखेपर्यंत होणाऱ्या कालावधीसाठी सेव्हिंग ठेव खात्यास ज्या त्या वेळी लागू असलेल्या व्याजदराप्रमाणे व्याज आकारणी करून नूतनीकरण करण्यात येतील व नुतनीकरण केलेल्या तारखेस लागु असणाऱ्या बॅंकेकडील ठेवींच्या व्याजदराप्रमाणे पुढील कालावधीसाठी व्याजदर लागु राहील याची कृपया नोंद घ्यावी,याबाबत नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही. तरी आपले ठेवीवरील व्याजात नुकसान होऊ नये यासाठी आपली बँकेकडील ठेव पावती मुदत संपल्याचा तारखेपासून पुढील १४ दिवसाच्या आत नूतनीकरण करून घ्यावी, हि नम्र विनंती.

सही

कम्पलायन्स रिड्रेसल ऑफिसर

सही

मुख्य कार्यकारी अधिकारी